महाराष्ट्र शासन
# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४६०३
**Ph.No** : (०७२१) २५७३०२७, २५७२५७७ **Website:** www.jdroamt.org
**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No:** (०७२१) २५७७९१३

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२३/ 1663
दिनांक 16 JUN 2023

**प्रति,**
**प्राचार्य,**
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित
पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय : डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रलंबित असलेल्या (विद्यार्थी /संस्था/विभागीय कार्यालय स्तरांवर) अर्जावरील कार्यवाहीबाबत शैक्षणिक वर्ष २०२२-२३..**

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२२/२६१४ दिनांक ०३ आक्टोबर २०२२
२. या कार्यालयामार्फत संस्थासोबतची दूरदृष्य बैठक दिनांक ०३ जानेवारी २०२३
३. मा.सहसंचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/०५ दिनांक ११/०१/२०२३
४.या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२३/१३८ दिनांक १३.०१.२०२३
५.या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२३/४१६ दिनांक ०९/०२/२०२३
६. प्र.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/३७ दिनांक १४/०२/२०२३
७. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२३/४५३ दिनांक १५ फेंब्रुवारी २०२३
८. प्र.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/|डीबीटी/विकाप/२०२२-२३/१४० दिनांक ११.५.२०२३
९. उपसंचालक, तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/१८० दिनांक १५/०६/२०२३

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,मंत्रालय,मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता बनविण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलव्दारे (संकेतस्थळ www.mahadbtmahait.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना.

महाडीबीटी पोर्टलव्दारे तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपरोक्त योजनांच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या अंमलबजावणीबाबत संदर्भ १ ते ८ अन्वये कळविण्यात आले आहे.डीबीटी पोर्टलवरील सदर योजनांचे संस्था स्तरांवर (Pending at Institute अंतर्गत) प्राप्त झालेल अर्ज प्रलंबित न ठेवता, संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली (मंजूर/नामंजूर) काढण्याबाबत सुचित करण्यात आलेले होते.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विद्यार्थ्यांना डीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्यासाठी तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज Sent Back अंतर्गत आहेत अशा विद्यार्थ्यांना Re-apply करण्यासाठी दि.३१/०५/२०२३ पर्यंत मुदत देण्यात आल्याचे कळविण्यात आले होत. आता डीबीटी पोर्टलच्या सोबत जोडलेल्या स्क्रीन शॉटनुसार, सदर मुदत पुनश्च: वाढवून **दि.३०/०६/२०२३ पर्यंत** देण्यात आलेली आहे.

संस्थानी संस्था अंतर्गत योजनेसाठी विद्यार्थ्यांच्या प्रलंबित अर्जाबाबत (संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज (Sent Back अंतर्गत), संस्था स्तरांवर तपासणीसाठी (Pending at Institute अंतर्गत) आहेत, अशा संस्थानी खालील सुचनांचे अवलोकन करुन दि.३०/०६/२०२३ च्यापूर्वी अर्ज निकाली काढावेत.

| अ.क्र | डॅशबोर्ड रिपोर्ट | संस्थांनी करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज (Pending at Institute अंतर्गत) | संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन निकाली काढावेत. तसेच जर विद्यार्थी संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र नसेल तर अर्ज Sent Back न करता संस्था स्तरांवरुन नामंजूर करावे.<br><br>तसेच जर संस्थाकडे पात्र विद्यार्थ्यांच्या प्राप्त अर्जांमध्ये भरण्यात आलेल्या वर्षातील संबंधित अभ्यासक्रमांचे शुल्क मंजूर नसेल तर संस्थांनी संबंधितांकडून शुल्क मंजूर करुन घेऊन अर्ज तात्काळ निकाली काढावे आणि जर विद्यार्थ्यांना अर्ज Sent Back करुन विद्यार्थ्यांकडून दुरुस्ती करुन प्राप्त करुन घ्यावे व अर्ज संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली (मंजूर/नामंजूर) काढण्यात यावे. |
| २ | संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज (Sent Back अंतर्गत) | संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांना तात्काळ बोलावून अर्जांची त्रृटी दूर करुन, अर्ज पुनश्च: जमा करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही. तसेच, जर संस्थेकडून अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर न करता Sent Back करण्यात आले असतील तर अशा विद्यार्थ्यांकडून संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त करुन घेऊन संस्था स्तरांवर कारणासह नामंजूर करावे.जेणेकरुन एकही अर्ज प्रलंबित राहाणार नाही. |

उपरोक्त सूचनानुसार, ज्या संस्था प्रलंबित अर्जाबाबत कार्यवाही पूर्ण करणार नाहीत व अर्ज प्रलंबित राहिल्यास तसेच मुदत संपल्यानंतर कार्यवाहीसाठी प्रलंबित असलेले अर्ज सिस्टिमव्दारे रद्द (Reject) झाल्यास तर अशा सर्व अर्जांबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

**सहपत्र** :वरीलप्रमाणे

**(डॉ.वि.र.मानकर)**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:** १. **मा.संचालक,**तंत्रशिक्षण संचालनालया,म.रा.मुंबई यांना माहिती करीता सविनय सादर.
२ .**प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

Inbox (6,831) - desk18@dtemahara ×   Aaple Sarkar DBT ×  +

mahadbt.maharashtra.gov.in/Home/Index

Skip To Main Content   Skip To Navigation

A+ A= A-   English

# आपले सरकार महाDBT

ऑनलाईन अर्ज कसा करावा? | लाभ योजना | पोस्टमॅट्रिक शिष्यवृत्ती | प्री मॅट्रिक शिष्यवृत्ती | वेतन योजना | शेतकरी योजना | कामगार योजना | विशेष सहाय्य योजना

Acceptance (New/Renewal) for A.Y. २२-२३ has been commenced. Last date for Application Acceptance (New/Renewal) for A.Y. २२-२३ is 30th JUNE २०२३ Application Re-apply has been e

इंडिया पोस्ट पेमेंट्स बैंक IndiaPost Payments Bank — आपका बैंक, आपके द्वार — Aapka bank aapke dwar

बँक खात्याशी आधार लिंक करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे

आपले सरकार डीबीटी पोर्टल मध्ये
आपले स्वागत आहे
वंचित आणि पात्र लाभार्थ्यांना थेट लाभासाठी
क्षमतापूर्ण विस्तार



डिजिटल लॉकरसह एकत्रित
DigiLocker

- नवीन अर्जदार नोंदणी
- अर्जदार लॉगिन
- पात्र योजना शोधा
- संस्था / विभाग / डीडीओ लॉगिन
- तक्रार / सूचना
- वापरकर्ता पुस्तिका
- ऑनलाईन अर्ज प्रक्रियेसाठी सूचना
- मॉप अप अर्जासाठी मार्गदर्शन
- पासवर्ड विसरलात
- कार्यालयाचे संपर्क तपशील
- आधार - एनपीसीआय सीडिंग फॉर्म New
- बँक आधार सीडिंग प्रक्रियेसाठी तपशील

Guidelines on Undisbursement Benefit

Guidelines for Courses Not Visible, Missing

सूचना

Attention!!!

- Application Acceptance (New/Renewal) for A.Y. २२-२३ has been commenced. Last date for Application Acceptance (New/Renewal) for A.Y. २२-२३ is 30th JUNE २०२३.
- Application Re-apply has been extended for A.Y. २१-२२ till 30th JUNE २०२३.
- Guidelines and Rules of procedure for application submission. Please read carefully.

Guidelines and Rules

महाविद्यालयांची यादी

All Schemes

- Social Justice and Special Assistance Department +
- Tribal Development Department +
- Directorate of Higher Education +
- Directorate of Technical Education +
- School Education and Sports Department +
- OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department +
- Directorate of Medical Education and Research +
- Minority Development Department +
- Skill Development, Employment And Entrepreneurship Department +
- Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri +
- Directorate of Art +

30°C Haze   Search   ENG IN   11:09 15-06-2023